Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास

प्रा.डॉ.नामदेव कोंडबाराव दळवी

**प्रस्तावना :-**

आज जगभरात कोरोनाने कहर केला असून आजच्या तारखेपर्यंत जगात १९,२८,०४९७८ लोकांना कोरोनाची लागन झाली आहे. यापैकी ४१४६७४५ रूग्ण मृत्यूमुखी पडले असून १७,११,६८६३७ सुधारणा झाली असून १७,७२,५०७६ रूग्ण उपचाराधीन आहेत. कोरोना या जागतिक महामारीला जवळपास १८ महिने पूर्ण झालेले असूनसुध्दा ही साथ नियंत्रणात आलेली दिसून येत नाही. या महामारीने संपूर्ण जगामध्ये धुमाकूळ घातला आहे हे आपण पाहतोच आहोत. लाखो लोक मृत्यूमुखी पडत आहेत. काही देशांची अर्थव्यवस्था खिळखिळ करून टाकणारी ही प्रचंड मोठी महामारी आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केलेला नुकसानीचा प्राथमिक स्वरूपातील अंदाज ९ लाख कोटी डॉलर्स म्हणजेच जपान आणि जर्मनीच्या एकत्रित राष्ट्रीय उत्पन्नांच्या किंवा भारताच्या राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ पट इतका आहे. या आर्थिक नुकसानीबरोबरच रोजगारात होणारी घट व त्यामुळे दारिद्रयात होणारी वाढ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अहवालात नमूद केली असून यामध्ये केवळ भारतातच ४० कोटी लोक दारिद्रयरेषेखाली ढकलेले जातील असे नोंदविले आहे. कोरोना या महामारीचे जगावर दुरगामी परिणाम झाले आहेत. मार्च २०२० पासून पूर्ण जग थांबले आहे. जवळपास या १८ महिन्याच्या काळामध्ये उद्योग, कंपन्या, कारखाने बंद पडल्यामुळे अब्ज लोकांना रोजगार गमवावा लागला आहे. यामुळे जगात भयानक बेरोजगारीचा भडका उडाला आहे. तसेच या महामारिच्या भितिने १८ महिने स्वतःला चार भिंतीच्या आत कोंडून घेतल्यामुळे मनो रूग्णाचे मोठ्या प्रमाणात प्रमाण वाढीस लागले आहे. याविषयी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की , कोरोना व्हायरस हे गेल्या १०० वर्षातील सर्वात मोठ आर्थिक आणि आरोग्य संकट आहे. यामुळे उत्पादन, रोजगार, शिक्षण, बेरोजगारी आणि लोकांच्या आरोग्यावर अभूतपूर्व नकारात्मक परिणाम झालेला आहे. अनेक घरातील कर्त्याव्यक्तीचे निधन झाल्यामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

प्रस्तुत शोध पेपरमध्ये कोरोना महामारीमुळे जगातील सर्वात जास्त दहा प्रभावित देशातील पिडीत रूग्ण संख्या, मृत्यू पडलेली संख्या, उपचारादरम्यान सुधारणा झालेली संख्या, उपचार घेत असलेल्या संख्येची आकडेवारी आणि मृत्यू दर यांचा आढावा घेतला आहे. तसेच भारतातील राज्य निहाय पिडीत रूग्ण संख्या, मृत्यू पडलेली संख्या,उपचारादरम्यान सुधारणा झालेली संख्या आणि उपचार घेत असलेल्या रूग्ण संख्येच्या आकडेवारी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन समस्या**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते त्यामुळे प्रस्तुत संशोधनात जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास ही संशोधनाची समस्या निवडली आहे

**संशोधनाची उद्दिष्टे**


1. कोरोना ही जागतिक महामारी समजून घेणेण
2. कोरोना महामारीने प्रभावित देशाचा अभ्यास करणे
3. कोरोना महामारीची वास्तव परिस्थिती समजून घेणे
4. कोरोना महामारीवरील उपाय योजनेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलणाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**जागतिक कोरोना महामारीची सद्य कालीन परिस्थिती**

| एकूण रूग्ण | मृत्यू रूग्ण | सुधारणा झालेले रूग्ण | उपचार घेत असलेले रूग्ण |
|---|---|---|---|
| **19,28,04,978** | 41,,46,745 | 17,11,68,637 | 1,77,25,076 |





वरील तक्ता आणि स्तंभालेखावरून असे स्पष्ट होते की, जगातील ७.६ अब्ज लोकसंख्येपैकी 19,28,04,978 नागरिकांना कोरोनाची लागन झाली. लागन झालेले प्रमाण जगातील एकूण लोकसंख्येच्या ०.०१३ एवढे आहे. 41,,46,745 नागरिक मृत्यूमुखी पडले असून यांचे शेकडा प्रमाण 2.15 टक्के एवढे आहे. एकूण लागन झालेल्यापैकी 17,11,68,637 रूग्णामध्ये सुधारणा झाली असून त्यांचे शेकडा प्रमाण 88.77 टक्के आहे. तर सद्या जगातील विविध दवाखाण्यात उपचार घेत असलेल्या रूग्णांची संख्या 1,77,25,076 एवढी असून त्यांचे शेकडा प्रमाण 9.19 टक्के आहे.

**जागतिक पटलावर पहिल्या दहा देशातील कोरोनाची सद्यकालीन परिस्थिती**

| अ. क्र. | देश | एकूण रूग्ण | मृत्यू रूग्ण | सुधारणा झालेले रूग्ण | मृत्यू दर | सुधारणा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| **1.** | अमेरिका | 35,213,554 | 626,172 | 29,478,173 | 1.77 | 83.71 |
| **2.** | भारत | 31,293,062 | 419,502 | 30,468,079 | 1.34 | 97.36 |
| **3.** | ब्राझिल | 19,524,002 | 547,235 | 18,250,711 | 2.80 | 93.47 |
| **4.** | रशिया | 6,078,522 | 152,296 | 5,450,004 | 2.50 | 89.66 |
| **5.** | फ्रांस | 5,933,510 | 111,565 | 5,669,033 | 1.88 | 95.54 |
| **6.** | इंग्लंड | 5,602,321 | 128,980 | - | 2.30 | - |
| **7.** | तुर्की | 5,563,903 | 50,761 | 5,405,339 | 0.91 | 97.15 |
| **8.** | अर्जेंटिना | 4,812,351 | 103,074 | 4,447,953 | 2.14 | 92.42 |
| **9.** | कोलंबिया | 4,692,570 | 117,836 | 4,449,027 | 2.51 | 94.81 |
| **10.** | इटली | 4,302,383 | 127,920 | 4,119,607 | 2.97 | 95.75 |

वरील तक्त्या वरून असे स्पष्ट होते की, जगात सर्वात जास्त अमेरिकेमध्ये 626,172 एवढे लोक कोरोनामुळे मृत्यू पावले असून त्यांचे शेकडा प्रमाण 1.77 टक्के आहे. त्याखालोखाल अनुक्रमे ब्राझिलमध्ये 547,235 नागरिक मृत्यूमुखीपडले असून त्यांचे शेकडा प्रमाण 2.80 टक्के आहे. तर भारतामध्ये 419,502 नागरिक मृत्यूमुखी पडले असून त्यांचे शेकडा प्रमाण 1.34 टक्के आहे. त्यानंतर अनुक्रमे रशिया, इंग्लंड, इटली, कोलंबिया, फ्रांस, अर्जेंटिना आणि तुर्की इत्यादी देशामध्ये मोठया प्रमाणात नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत.




वरील स्तंभालेखावरून असे स्पष्ट होते की, जगातील एकूण मृत्यू झालेल्या नागरिकांचे प्रमाण दर्शविले असून सर्वात जास्त मृत्यू दर सर्वात जास्त इटलीचा 2.97 टक्के आहे तर सर्वात कमी तुर्कीचा 0.91 टक्के आहे. रूग्ण सुधारणेचा सर्वात जास्त दर भारताचा 97.36 असून त्यानंतर अमेरिका 83.71 टक्के आहे.

15 मार्च 2021 नुसार भारतातील राज्यानुसार कोरोनाची स्थिती दर्शविणारा तक्ता

| अ.क. | राज्य | एकूण रूग्ण | मृत्यू झालेले रूग्ण | बरे झालेले रूग्ण | उपचाराधिन रूग्ण | मृत्यू दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र | 2028347 | 51109 | 1932294 | 43701 | 2.51 |
| 2. | कर्नाटक | 939775 | 12220 | 921592 | 5944 | 1.30 |
| 3. | केरळ | 932638 | 3761 | 859421 | 69216 | 0.44 |
| 4. | आंध्र प्रदेश | 887900 | 7154 | 879504 | 1242 | 0.80 |
| 5. | तमिळ नाडू | 838842 | 12363 | 821947 | 4532 | 1.47 |
| 6. | दिल्ली | 635217 | 10856 | 623096 | 1265 | 1.70 |
| 7. | उत्तर प्रदेश | 600470 | 8662 | 586505 | 5303 | 1.44 |
| 8. | पश्चिम बंगाल | 570177 | 10179 | 554578 | 5420 | 1.78 |
| 9. | ओरिसा | 335151 | 1959 | 332239 | 953 | 0.58 |
| 10. | राजस्थान | 317587 | 2766 | 312873 | 1948 | 0.87 |
| 11. | छतिसगढ | 305689 | 3706 | 297859 | 4124 | 1.21 |
| 12. | तेंलगणा | 294587 | 1601 | 290894 | 2092 | 0.54 |
| 13. | हरियाना | 267989 | 3022 | 263886 | 1081 | 1.12 |
| 14. | गुजरात | 261838 | 4388 | 254209 | 3241 | 1.67 |
| 15. | बिहार | 260794 | 1503 | 258136 | 1154 | 0.57 |
| 16. | मध्य प्रदेश | 255263 | 3812 | 248897 | 2554 | 1.49 |
| 17. | आसाम | 217154 | 1083 | 214248 | 476 | 0.49 |
| 18. | पंजाब | 173470 | 5616 | 165753 | 2101 | 3.23 |
| 19. | जम्मू कश्मिर | 124550 | 1936 | 121905 | 709 | 1.55 |
| 20. | झारखंड | 118734 | 1073 | 117148 | 513 | 0.90 |
| 21. | उत्तराखंड | 96180 | 1648 | 92105 | 1081 | 1.71 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 22. | हिमाचल प्रदेश | 57561 | 967 | 56200 | 378 | 1.67 |
| 23. | गोवा | 53469 | 768 | 51977 | 724 | 1.43 |
| 24. | पांडेचेरी | 33348 | 388 | 32918 | 19 | 1.16 |
| 25. | मनिपूर | 29072 | 371 | 28562 | 139 | 1.27 |
| 26. | चंदिगढ | 20957 | 334 | 20447 | 176 | 1.59 |
| 27. | अरूणाचल प्रदेश | 16828 | 56 | 16762 | 10 | 0.33 |
| 28. | मेघालय | 13764 | 146 | 13556 | 62 | 1.06 |
| 29. | नाँगलँड | 12099 | 88 | 11810 | 54 | 0.72 |
| 30. | लढाख | 9724 | 130 | 9526 | 68 | 1.33 |
| 31. | सिक्कीम | 6091 | 133 | 5779 | 84 | 2.18 |
| 32. | अंदमान निकोबार | 4994 | 62 | 4932 | - | 1.24 |
| 33. | मिझोराम | 4372 | 09 | 4333 | 30 | 0.20 |
| 34. | दादरा नगर हवेली | 3380 | 02 | 3334 | 06 | 0.05 |
| 35. | लक्षद्विप | 99 | 00 | 56 | 43 | 00 |
| | एकूण | | | | | 1.43 |

वरील तक्त्यांचा अभ्यास केल्यानंतर एक बाब स्पष्ट होते की, भारतात सर्वात जास्त मृत्यूदर पंजाब राज्याचा शेकडा ३.२३ टक्के एवढा आहे. त्याखालोखाल अनुक्रमे महाराष्ट्र २.५१, सिक्किम, २.१८, उत्तराखंड १.७० दिल्ली १.७० यांचा क्रमांक येतो. तर सर्वात कमी मृत्यू दर अरूणाचल प्रदेश ०.३३ टक्के असून त्याखालोखाल केरळ ०.४४, आसाम ०.४९, तेलंगाणा ०.५४, आंध्र प्रदेश ०.८० आणि राजस्थान ०.८१ यांचा क्रम लागतो.

**कोरोना व्हायरसपासून (COVID-19) कशी काळजी घ्यायची**

- स्वच्छ हात धुणे.
- पाणी आणि साबणाने ४० सेकंद हात धुणे. जर एखादा अल्कोहोल असणारे हॅंड वॉश वापरत असेल तर २० सेकंद पुरेसे आहेत. जर त्याचा हात अस्वच्छ असेल किंवा मातीमुळे खराब झाला असेल तर साबण आणि पाण्याचाच वापर केला पाहिजे.
- हातरुमाल किंवा टिश्यू पेपरचा वापर करणे.
- खोकताना किंवा शिंकताना नाकावर आणि तोंडावर रुमाल ठेवणे. रुमाल नसेल तर टिश्यू पेपरचा वापर करावा, अन्यथा हाताच्या कोपराने तोंड झाकावे. टिश्यू पेपरचा वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून देणे.
- तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करू नका.
- कोरोना वायरस लोकांच्या थुंकीतून एखाद्या पृष्ठभागावर पडू शकतो. नकळत एखाद्याचा हात त्या पृष्ठभागाला लागू शकतो. त्यामुळे तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करणे अनुचित.
- कमीत कमी तीन फुटाचे अंतर व मुखपट्टीचा (मास्कचा) वापर.

- समोरच्या व्यक्ती सोबत बोलत असताना त्याच्यापासून कमीत कमी तीन फुटाचे अंतर ठेवा. (या अंतराला सोशल डिस्टन्सिंग म्हणतात.)
- आंबट चवीच्या फळांचा आहारात समावेश.
- कोरोना व्हायरसच्या विरोधात लढा द्यायचा असेल तर आपली रोगप्रतिकारक क्षमता चांगली असणं अत्यंत गरजेचे आहे.यासाठी आंबट चवीच्या फळांचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. यामध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण जास्त असते.

**सारांश :-**

एकंदरीत भारत आणि जगातील एकूण कोरोना महामारीच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यावरून एक बाब स्पष्ट होते की, कोरोनावर कोणत्याही प्रकारची औषधी उपलब्ध नसतानासुद्धा जगातील या महामारीचा मृत्यू दर जेमतेम 2.14 च्या दरम्यान आहे. त्यामुळे ही महामारी फार गंभीर स्वरूपाची आहे, असे दिसून येत नाही. जगात कोरोनापेक्षा एड्स, डेंगू, कावीळ, कँसर, रक्तदाब, मदुमेह, सुगर, बीपी या आजावर अनेक प्रकारची औषधी व उपचार उपलब्ध असतानासुद्धा दररोज लाखो लोक मृत्यूमुखी पडतात. याकडे कोणत्याही देशाचे शासन गांर्भीयाने लक्ष देत नाही. कोरोनात जे काही लोक मृत्यूमुखी पडले आहेत यामध्ये रेमसेडिवरचे अतिरिक्त डोस, विविध आजार आणि भिती हेच एकमेव कारण असू शकते. कोरोना या महामारीची जागतिक पातळीवर पदतशीरपणे जाहिरात करून काही देशांनी यांचा योग्य तो फायदा करून घेतला आहे. दुसरी बाब म्हणजे या आजारांचे जास्तीत जास्त प्रमाण उच्चभ्रू लोकांमध्ये असल्यामुळेच त्यांनी लाकडाऊन ही संकल्पना शोधून काढली. कारण झोपडपट्टीमध्ये अनेक साथीचे रोग असून सुद्धा कोणत्याही देशाने या रोगाचे निदान करण्यासाठी लाकडाऊन केल्याचे उदा.इतिहासात सापडत नाहीत.

संदर्भ ग्रंथ :-

1. www.worldometers.info
2. www.who.int
3. www.wikipedia.org
7. www.who.org
4. www.cdc.gov
6. www.fda.gov